# श्वानांची सामाजिकता व स्थानिक महत्व

**मा**झ्या आजपर्यंतच्या उण्यापुऱ्या पन्नास एक वर्षांच्या श्वान विश्वात वावरण्याच्या प्रवासात मला अनेक पैदासकार जवळून बघण्याचा योग आला. त्यात मला सर्वश्रेष्ठ वाटले ते ओगलेवाडीचे उद्योगपती श्री. मुकुंदराव ओगले. मी त्यांना १९८६च्या सुमाराला भेटलो असेन. देना बँकेच्या पुणे विभागात मी त्यावेळी कार्यरत होतो. कोल्हापूरला आमचे काम जोरात चालले होते, त्यामुळे जाता येताना मी अर्धा पाऊण तास तरी मुकुंदरावांशी गप्पा मारायला थांबत असे. एक प्रथितयश उद्योगपती असून देखील मला आत्ता वेळ नाही असे त्यांनी सांगितल्याचे मला आठवत नाही.

त्यावेळी ग्रेट डेन जातीच्या श्वानांची पैदास ते करीत असत. त्यांनी मला अनेक गोष्टी शिकविल्या. त्यातल्या मला सर्वात महत्त्वाच्या वाटतात त्यातली पहिली -श्वानांचे सोशलायझेशन म्हणजे सामाजिकता व दुसरी म्हणजे श्वानांच्या वाढीच्या वयाप्रमाणे अपेक्षित अशीच वाढ करवून घेणे. एखाद्या विषयात रस निर्मम झाला की तो शिकण्यासाठी मुकुंदराव जी पध्दत अवलंबत ती खरीच अभ्यासण्यासारखी होती. तिची पहिली पायरी म्हणजे त्या विषयातील मिळतील तेवढी पुस्तके वाचून काढणे व त्यानंतर आवडतील त्या लेखकांची शागीर्दी करून जे लिहिले गेले नाही ते लिहिणे किंवा लिहिल्यानंतर जे अनुभव आले त्यामुळे लिखाणात आवश्यक ते बदल करून घेणे.

ग्रेट डेन संबंधी इंग्लंडच्या जीन लेन या बाईंनी लिहिलेले पुस्तक त्यांना आवडले. त्यांनी जीन लेनशी पत्रमैत्री करून त्यांना भारतात येण्याची विनंती केली. भारतात पाऊल ठेवल्यापासून ते परत जाण्यासाठी विमानात पाऊल ठेवेपर्यंत मी तुमचा सर्व खर्च करीन व भारतीय संस्कृती म्हणता येईल अशी सर्व स्थळे स्वतः बरोबर येऊन दाखवीन, शिवाय तुम्हाला जेथे जेथे जावेसे वाटत असेल त्या सर्व ठिकाणी बरोबर घेऊन जाईन या त्यांनी दिलेल्या आश्वासनाला जीन लेन बाई भाळल्या आणि त्यांनी मुकुंदरावांचे निमंत्रण स्वीकारले. त्यांच्या बरोबर प्रवासात झालेल्या चर्चेतून मी जेवढे शिकलो तेवढे सबंध आयुष्य खर्च केले तरी शिकलो नसतो असे मुकुंदराव नेहमी सांगत.

वरील परिच्छेद लिहिण्यामागे माझे पुस्तक आवडले तर माझ्याशी चर्चा करायला या किंवा मला बोलवा असे सांगण्याचा माझा अजिबात उद्देश नाही. पण शागिर्दी करावी तर उपलब्ध असलेल्यांतील सर्वोत्कृष्ट माणसाची करावी एवढेच मला सांगायचे आहे.

मुकुंदरावांनी मला जो सोशलायझेशनचा मुद्दा सांगितला तो मला पैदासकारी करू इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसाला सांगायलाच पाहिजे असे वाटते. त्यांचा दुसरा मुद्दा अपेक्षित वाढीबद्दलचा आहे. तो मी आहार या प्रकरणात दिलेला आहे. श्वानांचे सोशलायझेशन हा मुकुंदरावांचा शब्द. सोशलायझेशन म्हणजे आई वडिलांच्या कृपाछत्रातून बाहेर पडून समाजात आपले गुरू शोधण्याची प्रक्रिया. **मातृदेवो भव - पितृ देवो भव**

**आचार्य देवो भव - ग्रंथ देवो भव** असे आपल्याकडे म्हणतात. श्वानांत व माणसांत फरक असतो. तो फरक एवढाच की आईनंतर ते आचार्य म्हणजेच गुरूकडे जातात व तेथेच थांबतात. आईनंतर गुरूकडे जाईपर्यंतच्या संधिकाळात पैदासकाराचे मोठे कर्तव्य असते. हा संधिकाल पिलाच्या जन्मापासून चार ते पाच आठवड्याने

येतो. एका सुसंस्कृत पैदासकाराकडून घेतलेली पिले व केवळ धंदेवाईक पैदासकाराकडून घेतलेली पिले यांत जो फरक आढळतो त्याचे मुख्य कारण या संधिकाळात पिलांना जो श्रीगणेशा केलेला असतो त्यातच मिळते.

ग्रेट डेन सारख्या अवाढव्य वाढणाऱ्या श्वानांत ते अति महत्वाचे असते. पण लडिवाळपणे अंगाखांद्यावर बागडणाऱ्या चिमुकल्या सोबती श्वानांतही ते तितकेच महत्वाचे असते. पाच आठड्यांच्या या पिलाच्या पावलांचे मखमली स्पर्श आपल्यासाठी स्वर्गसुखाचा अनुभव देणारे असतात. पण आपल्या पिलांपासून पुढे कोणाला त्रास होऊ नये यासाठी पिलांच्या पावलांच्या स्पर्शसुखाचा मोह आपल्याला आवरावाच लागतो, असे मुकुंदराव प्रत्येक वेळी आग्रहाने सांगत. पिले झोपेतून उठून आपापसात खेळायला सुरुवात करतात, त्या सुमारास मी पिलांच्यापासून काही अंतरावर जमीनीवर मांडी घालून बसत असे असे मुकुंदराव सांगत. आपण असे मांडी घालून बसलो आहोत हे पिलांच्या लक्षात येत असताना आपल्याला पिलांच्या सहज प्रवृत्ती समजतात. कोण वासाने काय करतो, कोण नजरेने बघतो, तर कोण मनातल्या विचाराने प्रभावित होऊन विचार कोठून येतो ते पाहू लागतो. कानाने तीक्ष्ण असणारी पिले आपल्या श्वासाच्या आवाजानेही किंवा कपड्याच्या सळसळाटानेही त्यांचे लक्ष आपल्याकडे वळवितात.

आपल्या प्रदेशात काहीतरी नवी वस्तू वा नवा प्राणी आला आहे हे लक्षात आल्यावर प्रत्येक पिलाची प्रतिक्रिया त्याच्या सहज प्रवृत्तीप्रमाणे वेगवेगळी असते. काही घाबरट पिले लक्षात येऊनही लक्षात न आल्यासारखी पडून राहतात, किंवा इतर पिलांत मिसळून तिरक्या नजरेने बघत राहतात. काही पिलांचे कुतूहल त्यांना शांत बसू देत नाही. ती नव्याने आलेल्या मोठ्या वस्तू किंवा प्राण्याचा वेध घेऊ लागतात. आपल्या जवळपास येऊन आपल्या होणाऱ्या प्रतिक्रिया न्याहाळतात. काही धीट पिले आपल्याशी दोस्ती करण्याच्या उद्देशाने शेपूट हलवीत आपल्याकडे येतात. श्वानांच्या या पिलांना माणूस या प्राण्याची ओळख करून देण्यासाठी आपण तेथे बसलेलो असतो. माणसांशी कसे वागावे याचे पहिले धडे ही पिले गिरवत असतात. माणसाचा स्पर्श घेणे ही त्यांची माणसांशी नाते जोडण्याची पहिली कृती असते.

कानाने येणारा आवाज, डोळ्याने दिसणारे रूप, नाकाने येणारा वास, जिभेला कळणारी चव आणि कातडीतून मिळणारा स्पर्श अशा पंचेंद्रियातून सर्व प्रकारे ज्ञान घेण्याचा प्रयत्न माणूस नावाच्या पदार्थाची ओळख करून घेण्यासाठी श्वानांची पिले करत असतात. आपण आपल्या बोटांच्या टोकांनी स्पर्शाचा अनुभव घेतो. स्पर्श करीत असलेला पृष्ठभाग गुळगुळीत आहे का खरखरीत हे आपल्याला बोटांच्या टोकांनी कळते. त्या पृष्ठभागाचे तापमान समजण्यासाठी आपण आपल्या हाताच्या बोटांच्या नखांमागची कातडी वापरतो. तापमानातील त्याहून बारीक फरक जाणून घ्यायचा असेल तेव्हा आपल्या डोळ्याखाली आपल्या कवटीची किनार हाताला लागते तेथली कातडी वापरतो. श्वान पिलांची स्पर्श जाणण्याची पध्दत आपल्यापेक्षा फार वेगळी नाही. श्वान त्यांच्या पुढच्या पायाच्या बोटांची टोकेच तापमान समजण्यासाठी वापरतात. थोडी भीड चेपली की श्वानांची पिले आपल्या जवळ बसलेल्या माणसाच्या जवळ सहज पोहोचू शकतील अशा ठिकाणी म्हणजे आपल्या मांडीवर किंवा आपण उभे असलो तर आपल्या पायांवर त्यांची पावले ठेवतात.

पिलांच्या पावलांच्या मऊ तळव्यांचा मखमली स्पर्श आपल्याला स्वर्ग सुखाचा अनुभव देतो. आपल्याला झालेला आनंद पिलांना समजतो आणि हाच अंगावर उड्या मारण्याच्या सवयीचा शुभारंभ वा अशुभारंभ ठरतो. अशुभारंभ असे शब्द मी वापरले कारण पिलू त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीप्रमाणे तुमच्या समोरून न येता उजव्या डाव्या अशा कोणत्यातरी बाजूने येते व त्याचा पुढचा पाय तुमच्या पावलांवर किंवा मांडीवर ठेवते. आवाज, रूप, गंध व स्पर्श ज्ञानाने तुमची एक माणूस म्हणून

ओळख झाल्यावर ओळख पूर्ण होण्यासाठी तुमची चव देखील त्याला समजावी म्हणून ते पिलू तुम्हाला चाटते. किंवा तुमचा मिळेल तो अवयव अथवा पँट किंवा सदऱ्याचे टोक त्याच्या तोंडात घेते.

आपल्या तोंडात वेगवेगळ्या चवी कळविणाऱ्या गंधपेशी या जिभेच्या वेगवेगळ्या भागात असतात, जसे जिभेच्या टोकावर गोड चव समजते. श्वानाच्या लालाग्रंथी माणसासारख्याच दाढांखाली असतात. चव कळण्यासाठी लाळ लागते. म्हणून ते पिलू तुमच्या पायाचा अंगठा त्याच्या दाढेजवळ नेऊन चघळते. त्याचे अणकुचीदार दात आपल्याला लागतात. अशा वेळी आपण आरडाओरडा केला तर त्याची गंमत वाटून पिले पुन्हा पुन्हा तसेच करू लागतात. श्वान पिलाच्या या क्रियांची सवय त्यांना लागू नये म्हणून तुम्ही काय खबरदारी घ्यायची ते आता पाहू. त्यांचे बघणे, ऐकणे, वास घेणे यांचा आपल्याला त्रास होत नाही असे त्यांना वाटले पाहिजे. माणसांना त्रास होतो तो त्यांच्या स्पर्श आणि चव घेण्याच्या क्रियांचा. पिले ज्यावेळी आपल्या जवळ येतील त्यावेळी आपण आपला तळहात त्यांच्या समोर केला की ते त्यांची पावले आपल्या तळहातावर ठेवतात. त्यांची स्पर्श घेण्याची भूकही भागते आणि आपण त्यांना शेकहँड देण्याची प्रक्रिया शिकवू शकतो. योग्य वेळी योग्य क्रिया आपण केल्या की दीड महिन्यांची श्वान पिले व्यवस्थित शेकहँड देऊ शकतात. आपला उजवा हात पुढे करून त्याला उजव्या पायाने शेकहँड करायला शिकवावे.

श्वान पिलांची दोस्ती करण्याची प्रक्रिया आपण शेकहँडवरच थांबविली पाहिजे. पुढे जाऊन त्यांचे पुढचे दोनही पाय तुमच्या मांडीवर ठेवून तुम्हाला ती रेटू लागतात. दोन श्वान पिले एकमेकांशी खेळताना स्वतःचे पुढचे पाय समोरच्याच्या खांद्यावर ठेवून रेटून त्याला पाडण्याचा प्रयत्न करतात. तोच प्रयोग ती माणसांवरही करतात. अशा वेळी समोरच्याने पिले आपले पुढचे दोन्ही पाय दूर करून (पान ३४)

माणसांच्या कुस्तीत जसे समोरच्याला चारी मुंड्या चीत केले म्हणजे वरच्याचा विजय झाला असे ठरते, तसेच श्वानांतही पाठीवर उताणे पडले की पाडणारा विजयी ठरत असतो.

एक पिलू जेव्हा तुमच्या मांडीवर त्याचे दोन्ही पुढचे पाय रोवते, तेव्हा त्याला तुमची ताकद आजमावयाची असते. त्याचा हा खेळ आपण  वेळीच तेथल्या तेथेच थांबायला हवा, नाही तर मोठा झाल्यावर देखील हा श्वान तुमच्या खांद्यावर त्याचे पुढचे पाय ठेवून तुम्हाला पाडण्याचा प्रयत्न करतो.

आपण दोस्ती दृढ करण्यासाठी किंवा दाखविण्यासाठी एकमेकांच्या खांद्यावर हात टाकतो, तसे श्वान देखील दोस्तांच्या खांद्यावर आपले पुढचे पाय टाकतात. कानाची पाळी चाटणे आणि तुमच्या कानाच्या पाळीचा हलकेच चावा घेणे या क्रिया श्वान तुमच्यावरील त्याचे प्रेम दाखविण्यासाठी करीत असतात.

(लोकमतचा फोटो घेणे)

फोटोमधील मुलीला होत आहे तसा आनंद तुम्हाला झाला तर तुमच्या श्वानाला त्याची प्रेम व्यक्त करण्याची चटक लागते आणि मग तुम्ही चांगले कपडे घालून पार्टीला निघाला असलात की त्याचे प्रेम उफाळून येऊन तो तुमच्या खांद्यावर पाय ठेवून तुमचे गाल चाटू लागतो. हे पुढे होणारे परिणाम टाळण्याची योग्य वेळ ही एक महिन्याच्या पिलाला त्याचे पुढचे

पाय आपल्या मांडीवर रेटू न देणे हीच असते. पाया पक्का असला तरच पक्की इमारत उभारता येते हे लक्षात ठेवावे. अंगावर पाय रोवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पिलाला त्यापासून परावृत्त करण्यासाठी त्याला आपल्या हाताने त्याच्या खांद्याच्या बाजूने लोटून त्याला पाठीवर उताणे पाडावे व तेथेच दाबून ठेवावे. असे दाबून ठेवलेले पिलू तुमचा हात चाटून तुमचा हात बाजूला काढण्यास तुम्हाला सांगण्याची शक्यता असते. असे होऊ नये म्हणून पिलाला उलटे पाठीवर हलकेच दाबून ठेवण्याची क्रिया तुम्हाला पिलाचे डोळे उघडता उघडता किंवा थोडे त्या आधीच म्हणजे पिले दोन आठवड्यांची असल्यापासूनच करावी लागते.

पिलाला पाठीवर उताणे धरले की ते सरळ होण्याच्या प्रयत्नात त्याची मान वळवून डोळे फिरवते, खांदे वळवून स्वतःचे वजन एका बाजूला टाकते व मागचे पाय व पुठ्ठा वळवून कुशीवर वळण्याचा प्रयत्न करते. या हालचालीमुळे त्याच्या पाठीच्या कण्याला व कण्यातील मज्जारज्जूंना उत्तम व्यायाम होतो. व्यायामापेक्षाही हेतुपूर्वक किंवा हेतू साध्य करण्यासाठी शरीराची हालचाल योग्य पध्दतीने करण्यासाठी ज्या मानसिक व बौध्दिक क्रिया कराव्या लागतात, म्हणजे डोके चालवावे लागते ती डोके चालविण्याची त्याला सवय लागते व श्वान पिले बुध्दिवान होतात असा प्रयोगाअंती काढलेला निष्कर्ष आहे.

आपण तयार केलेली पिले हुशार, बुध्दिमान व्हावी असे वाटत असेल तर पिलांची आई त्यांना आपल्या नाकाने ढकलून त्यांचे पोट चाटण्यासाठी उलटे पालटे करते त्या वेळेपासून म्हणजे पिले एक आठवड्याची असल्यापासूनच तुम्ही पिलांना धरून उलटे पाठीवर वळवले व स्वतःच्या अंगठ्यांनी हलका जोर देऊन त्यांना सरळ होण्यासाठी लागणारी ताकद योग्य ठिकाणी लावण्यासाठी बुध्दी वापरावयाची सवय लावली तर हळू हळू आपली ताकद जास्त जास्त लावत पिलांची बौध्दिक ताकद वाढविली की डोळे उघडण्याआधीच पिले हुषार झालेली असतात. पाच आठवड्यांची पिले झाली की त्यांची शिकण्याची क्षमता इतकी वाढलेली असते की तुम्ही हाताने लोटून त्याला पालथे पाठीवर पाडलेत की त्याचा अर्थ समजून पिलू तुम्हाला जे आवडत नाही ते टाळू लागते.

पिलांच्या वाढीवर त्यांच्या आहाराचा खूपच परिणाम होत असतो. आपल्याला हवे तसे वागणाऱ्या आई - वडिलांची (नर - माद्यांची) निवड करून एक खानदान तयार करण्याचा मार्ग तुम्ही चोखाळत असाल तर पिलाच्या आईचे दूध हा पिलांसाठी सर्वोत्तम आहार ठरतो. आता बाजारात खास पिलांकरिता ज्याला विनिंग-डायर म्हणजे आईचे दूध तोडून बाहेरच्या आहारावर नेण्याच्या वेळी देण्याचे वैशिष्ट्यपूर्ण तयार खाद्य मिळू लागले आहे. जागतिक बाजारपेठ ही ज्यांनी केवळ नावावर काबीज केलेली आहे, अशा जगप्रसिध्द कंपन्याच हे खाद्य तयार करतात. दूध तोडण्याचा आहार असा विशिष्ट शिक्का नसलेले बाजारातले कोणतेही खाद्य अशा वेळी वापरू नये. त्यापेक्षा हा आहार घरच्याघरी आपण कसा तयार करू शकतो ते पाहू.

निसर्गात श्वानांना योग्य आहार म्हणजे जनावरांची वजडी. वजडी म्हणजे पोट व आतडी. श्वान कुळातील सर्वच प्राण्यांना आतडी हा अगदी लोभविणारा पदार्थ असतो. कारण त्या वजडीमध्ये चरबीचे घटक व पाचक रस यांचे योग्य प्रमाण असते. बाजारात ज्यावेळी तयार खाद्ये नव्हती, त्यावेळी वजडी शिजवून, उकळून बहुतेक धंदेवाईक श्वानपालक स्वतःचे श्वान खाद्य तयार करीत असत. हातसडीचा तांदूळ, हातसडीचा नसला तर हलक यंत्रावर पूर्ण कोंडा काढण्याऐवजी हलका, अर्धवट कोंडा काढलेला तांदूळ व वजडी एकत्र शिजायला ठेवून तांदूळ शिजला की उतरवून त्यात आपल्याला योग्य वाटतात ते पदार्थ घालून प्रत्येक श्वानपालक स्वतःचे खाद्य तयार करीत असे.

काही कारणांनी पिलाला आईचे दूध कमी पडत असेल तर श्वानांसाठी शिजविलेल्या अन्नातला रस्सा बाजूला काढून तो लहान मुलांना वरचे दूध पाजायला वापरतात, त्या नरम दुधाच्या बाटल्यांमध्ये भरून आम्ही पिलांसाठी कृत्रिम दूध देत असू. पोट भरलेली पिलावळ अगदी छोटी, केवळ आईच्याच दुधावर पोसली जाणारी पिलावळ जेव्हा त्यांचे पोट छान भरलेले असते अशा अवस्थेत झोपलेली असते, तेव्हा त्या पिलांचे घोरणे, हुंकार, असा सर्वांचा मिळून एक छान कर्णमधुर आवाज तेथे गुंजत असतो आणि पिले शांत झोपलेली असतात. आईचे दूध कमी पडत असेल, तर किंवा आईच्या आहारात नको ते पदार्थ आले असतील तर त्याचा परिणाम ताबडतोब पिलावळीच्या झोपेवर, तेथे गुंजणाऱ्या आवाजावर झालेला दिसतो.

सदोष किंवा कमी दूध मिळणाऱ्या पिलावळीतील पिलाची झोप चाळवलेली असते. पिले झोपेत कण्हत असतात किंवा आईचे लक्ष वेधण्यासाठी कुई कुई असे आवाज करत रडत असतात. आईचे पोट बिघडलेले असेल तर आईची विष्ठा पाहून ते श्वान पैदासकारांच्या लक्षात येते. पण आईचे पोट ठीक आहे व तरीही पिले रडत असतील तर त्यांचे पोट भरत नाही असे लक्षात येते. वजडी व तांदूळ शिजत ठेवताना थोडे जास्त पाणी घालून ते मिळून उकळवावे व भात शिजला की ते खाली उतरवून ठेवावे. त्या खाण्यावरचा तवंग डावाने वरच्यावर काढून घेऊन तो लहान मुलांच्या दुधाच्या बाटल्याने पिलांना पाजावा. बाजारात दुधाच्या बाटल्यांची बुचे मिळतात. त्यात वेगवेगळ्या वयाच्या बालकांना पाजण्यासाठी वेगवेगळी बुचे असतात. श्वान पिलांची दूध शोषून घेण्याची ताकद ही माणसाच्या छोट्या बालकाच्यापेक्षाही कमी असू शकते. म्हणून रस्सा पाजताना त्या रश्शाच्या जाडीप्रमाणे छोटे मोठे भोक बुचाला पाडून व बुचाचे रबर किंवा प्लास्टिक कमी अधिक ताकदीचे कडक किंवा नरम वापरून रस्सा योग्य गतीने व अनावश्यक ताकद न लावता पिलाच्या तोंडात उतरेल व त्यांना पिता येईल अशी व्यवस्था करावी लागते.

चांगल्या वाढत असलेल्या पिलांच्या आईचे दूध कमी होऊ लागले म्हणजे पिलावळ सात ते नऊ आठवड्यांची झाली की केवळ आईच्या दुधावर पिलाचे पोट भरेनासे होते. अशावेळी पिले भुकेलेली असली की आणि आईच्या अंगावर सोडण्याआधी खाण्यावरचा रस्सा आधी बाटल्यांत भरून व नंतर बशांतून पिलांना देण्याची सुरुवात करावी. पिले बशीमधून रस्सा चाटू लागली की रस्सा काढताना खालचा जाड जाड रस्सा घ्यावा व एक दोन दिवसात त्या रश्श्याबरोबर वजडीचे योग्य आकाराचे तुकडे व भाताची शिते त्यांत घालावीत. पिले रश्यातले तुकडे उचलू लागली की रश्श्याचे प्रणाण कमी करून खाणे वाढवत न्यावे. पिले वाढवत असताना शाहण्या पैदासकाराने चुकूनही दूध या पदार्थाचा वापर करू नये. दूध हा स्तन्य ग्रंथींचा स्राव असतो. आई व पिलांच्या जैविक नाते संबंधामुळे प्रत्येक पिलावळीला योग्य असेच दूध आईच्या स्तनात निर्माण होत असते. गायी-म्हशींच्या दुधाचा जो अभ्यास झालेला आहे तसाच श्वानांच्या दुधाचाही झालेला आहे. वीण झाल्याबरोबर दाट, प्रोटीनयुक्त, ज्याला आपण चीक म्हणतो, असे दाट दूध येते. कालांतराने नेहमीचे पातळ दूध येते. दुग्धकाल संपताना क्षार जास्त असलेले चवीला खारट लागणारे, कमी प्रमाणात स्त्रवणारे दूध येते. पिलाच्या वाढीच्या अवस्थेनुसार योग्य असे हे दूध असते तसेच त्या त्या पिलाच्या आवश्यकतेनुसार वेगवेगळे घटक कमी जास्त प्रमाणात असणारे दूध स्तनात तयार होत असते. श्वानाचे दूध, बकरीचे दूध, म्हशीचे दूध यांतील वेगवेगळ्या घटकांचे प्रमाण तर वेगवेगळे असतेच, पण त्यातील घटकांची रासायनिक घडण देखील वेगवेगळी असते.

ऐतिहासिक काळात राजवंशांतील मुलांना अंगावर पाजण्यासाठी दूध दाईचे आयोजन केले जात असे. राणीला दूध कमी असले तर त्याचवेळी बाळंत झालेली दूध दाई आणली जात असे. त्यावेळी राजाकडे काय बाकीच्या गाई म्हशी नव्हत्या

का? पण दुधाचा बालकाच्या वाढीवर, खासकरून बौध्दिक वाढीवर होणारा परिणाम आपल्या आयुर्वेदाचार्यांना माहीत होता. म्हणून माणसाच्या मुलांना माणसाच्या दुधाचे आयोजने केले जात असे. वीज निर्मितीत जनरेटर चालविण्यासाठी पेट्रोल किंवा डिझेल इंजिने वापरली जातात. त्या इंजिनात डिझेल ऐवजी रॉकेल वा पेट्रोलसारखे इंधन वापरले किंवा पेट्रोल इंजिनात डिझेल वापरले तर इंजिनाची वाट लागते. तसाच परिणाम श्वानांच्या शरीरावर श्वानांच्या पिलांना आईच्याऐवजी गाई म्हशीचे दूध देण्यामुळे होत असतो. पिलांना दूध देण्याची वेळ आलीच तर दुधाऐवजी गोड दही व गोड दह्याचे ताक श्वानांना द्यावे. पण इतर प्राण्यांचे दूध चुकूनही देऊ नये.

श्वानांच्या खाण्यातील रस्सा हाच पिलांसाठी आईच्या दुधाखालोखाल योग्य आहार आहे. आईच्या दुधाला पर्याय म्हणून श्वानखाद्याचा रस्साच वापरावा. आपल्याकडे बाजारात श्वानांसाठी वापरायचा दूध तोडण्याचा आहार परवडेल अशा किमतीत सर्वत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून पिले वाढविण्याचा खर्च कमी करत पिलाच्या वाढीत खंड न पाडता आपण श्वानांचा खाण्याचा रस्साच वर सांगितल्याप्रमाणे वापरावा. बाजारातून आणलेले तयार खाणे आणि तुम्ही स्थानिक पदार्थापासून शिजविलेले खाणे यात आणखी एक मोठा फरक असतो, तो म्हणजे स्थानाचा. स्थानिक पदार्थापासून स्वतः शिजविलेल्या खाद्यातूनच हा परिणाम मिळू शकतो.

प्रत्येक स्थानाचे आपले असे एक खास वैशिष्ट्य असते. घोडे अरबस्तानात जन्माला येतात, तसे जगात इतरत्र कोठेही निर्माण होऊ शकत नाहीत. हिंदुस्थान- भारत हा कोंबड्यांचा देश आहे. आज पाश्चिमात्यांनी कोंबड्यांच्या व्यवसायात मोठी मुसंडी मारली असली तरी त्यासाठी त्यांना भारतात निपजलेल्या कोंबड्यांचाच वापर करावा लागला व आजही करावा लागत आहे. प्रत्येक विभागाचा जात निर्माण करण्यात मोठा वाटा असतो. म्हैस हा आशिया खंडातील प्राणी. पण कोल्हापूची म्हैस आणि पंढरपूरची म्हैस यांत जमीन अस्मानाचे अंतर असते. एखाद्या विशिष्ट ठिकाणी जन्मणाऱ्या व तेथले स्थानिक पदार्थ खाऊन वाढलेल्या जीवांतील प्रवृत्ती व इतर गुणधर्मांवरही त्या त्या स्थलाचा खूप परिणाम होत असतो. तुम्हाला वैशिष्ट्यपूर्ण घराणे निर्माण करायचे असेल तर - श्वान विश्वात आपला असा एक ठसा उमटवायचा असेल तर स्थानिक पदार्थापासून स्वतः शिजवून रोजच्या रोज तयार केलेल्या खाद्याला पर्याय नाही.

कितीही प्रयत्न केला तरी स्थानाचा परिणाम तुम्हाला टाळता येत नाही. विसाव्या शतकाच्या मध्यानंतर स्थानिक खाद्य वापरल्याने हैदराबादचे जंग कुटुंब स्वतःचा ठसा श्वान विश्वात उठवू शकले. २१व्या शतकाच्या सुरुवातीला आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेत तयार खाणे वापरल्याने श्वानांत सारखेपणा येतो आहे. पण जेव्हा उन्नीसा बीसा म्हणजे शेवटच्या २-४%वर स्पर्धा येते, तेव्हा तयार खाणेदेखील कोणत्या देशांत तयार झालेले आहे त्यावर त्या खाण्याचे परिणाम उमटलेले स्पष्टपणे दिसतात. तुम्ही जेथे राहता त्या भागाचे गुणधर्म तीन चार वर्षांत तुमच्या लक्षात येऊ लागतात. श्वान हा जर्मनीतील प्राणी असावा असा माझा समज आहे. पण एकदा तो येऊन तुमच्या स्थानात स्थिरावल्यानंतर त्याच्यावर होणारे परिणाम न्याहाळून योग्य निवड करून व स्थानिक पदार्थांपासून त्यांच्या स्थानातील पाण्यात शिजविलेले पदार्थ देऊन तुम्ही आपला ठसा श्वान विश्वात उमटवू शकता. प्रत्येक स्थानाचा परिणाम योग्य त्या पाण्यावर, वनस्पतींवर, व प्राण्यांवर होत असतो, हे लक्षात घेऊनच तुम्ही श्वान पैदासकारीच्या क्षेत्रात उतरायला हवे.

स्थानांकित (टेरियर) हा खरे तर आपल्या गिऱ्हाइकासाठी सर्वात महत्वाचा श्वान वर्ग आहे. इंग्रजीत टेरियर हा शब्द टेरिटोरी-क्षेत्र, स्थान या अर्थी वापरल्या जाणाऱ्या शब्दापासून बनविलेला आहे. बऱ्याच जणांचा असा गैरसमज होतो की

टेरियर हा शब्द टेरर - भीतिदायक या शब्दापासून बनविला गेलेला असावा कारण बुल टेरियर, फॉक्सटेरियर, एअरडेल टेरियर या जाती त्यांच्या भडकू, भांडकुदळ स्वभावासाठी प्रसिध्द आहेत. अतिशय जिद्दी स्वभावाचा हा श्वानवर्ग मनाने स्वतंत्र वृत्तीचा, इतरांशी देणे घेणे नसलेला, आपल्याच तारेत - नशेत गुंग असणारा, मात्र स्थानाशी जोडला गेलेला असतो. या वर्गाला स्थानांकित असे मराठी नाव जे मी देतो आहे ते त्यांच्या या स्थानाशी एकरूप होऊन राहण्याच्या प्रवृत्तीमुळे. स्थान - अंकित या दोन शब्दांचा संधी करून स्थानांकित हा शब्द तयार झाला आहे. अंकित शब्दाचा अर्थ मांडी असा होतो. स्थानाच्या मांडीवर निर्धास्त होऊन राहणारा तो स्थानांकित असा हा अर्थ टेरियरचा पूर्ण अर्थ सांगून जातो. आपण आपल्या वयस्क मित्रांना पत्राच्या शेवटी स्नेहांकित म्हणजे स्नेहाने जोडला गेलेला असे लिहितो. तसा स्थानांकित हा शब्द मला टेरियर या शब्दाचा मथितार्थ सांगणारा वाटला म्हणून मी तो वापरतो आहे. श्वान आणि मांजर या दोन पाळीव प्राण्यांची वैशिष्ट्ये सांगताना श्वान हा मालकाशी जोडून राहणारा तर मांजर हा प्राणी स्थानाशी जोडून राहणारा प्राणी आहे असे सांगितले जाते. या दृष्टीने धनगरी ही जात माणसाशी सर्वात जास्त जोडून राहणारी, त्या खालोखाल शिकारी ही जात माणसापेक्षाही इतर श्वानांशी जास्त जवळीक साधणारी, तर मालकापासून दूर, मांजरांच्या जवळपास जाणारा श्वानवर्ग असतो, तो या स्थानांकित श्वानांचा.

आपले ग्राहक हे श्वानाकडे मुख्यतः बंगल्याचा रखवालदार म्हणून बघत असतात. बंगल्याच्या आवारात कोणी त्रयस्थ फिरकू नये म्हणून कत्र्यापासून सावध राहा अशा पाट्या ते अभिमानाने दारावर लटकवीत असतात. पण श्वानाबरोबर घालविण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. श्वानाने आपले आपण राहावे. बंगल्याभोवती फिरत राहावे व कोणीही परका आत येण्याचा प्रयत्न करताना दिसला तर त्याच्या अंगावर भुंकून त्याला दूर ठेवावे. तेवढ्यावर न जुमानता तो परका आत येण्याचा प्रयत्न करू लागला तर त्याच्यावर हल्ला करून वेळप्रसंगी त्याला चावून त्याचे कपडे फाडून त्याला परतवून लावावे ही सर्वसाधारण श्वानपालकांची म्हणजे आपल्या ग्राहकांची श्वानाकडून अपेक्षा असते. स्थानांकित श्वान या सर्व अपेक्षा पूर्ण करतात. मुख्य म्हणजे ते तसे एकलकोंडे असतात. आपल्या स्थानावर इतर कोणीही आलेले त्यांना अजिबात चालत नाही. उंदीर, मांजर तर सोडाच, पण कावळा. चिमणी यांच्याशीही त्यांचे वैर असते.

परक्या माणसांवर गुरगुरून, वेळप्रसंगी चावून आपला दबदबा निर्माण करून ठेवणे त्यांना आवडते. जरा कोठे खुट्ट झाले की स्वारी तेथे हजर. शेपूट, पाठीवरचे केस ताठ करून डोळ्यातून अंगार ओकत घशातल्या घशात गुरगुरत अंगावर झेपावण्याच्या पवित्र्यांत दात विचकून तलवार म्यानातून उपसावी तसे ओठ करून दात बाहेर चावा घेण्याच्या तयारीत ते जेथून आवाज येतो किंवा हालचाल दिसते तेथे पोहोचतात.

निडर स्वभाव आणि हल्ला करून धरून ठेवण्याची जिद्द यामुळे या स्थानांकित वर्गातील जाती खूपच लोकप्रिय झाल्या होत्या. जे आपल्या कामात व्यस्त होते व ज्यांना संरक्षणाची आवश्यकता वाटे अशा हिंदुस्थानात आलेल्या इंग्रजांनी आपल्या बरोबर या जातींचे श्वान आणले. स्वतःचा बंगला असणाऱ्या श्रीमंत वर्गाकरिता हा श्वानप्रकार अगदी योग्य आहे. स्थानांकित ही प्रवृत्ती आहे. जात तयार करताना विशिष्ट प्रकारे वागणाऱ्या नर, माद्या एकत्र आणून त्यांच्या पिलावळी घेऊन जात निर्माण केली जाते. पण प्रत्येक पिलावळीत काही पिले ही आई वडिलांपेक्षा वेगळी होतातच. धनगरी श्वान जातींच्यापेक्षाही शिकारी श्वान जातींमधून स्थानांकित पिले निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. महाराष्ट्र व कर्नाटकात शिकारी श्वान जाती भरपूर आहेत. कारवारी आणि पिसुरी प्रवृत्ती या जातींतून बऱ्याच प्रमाणांत स्थानांकित श्वान मिळू शकतात. पैदासकारी करणाऱ्यांनी पिलावर नजर ठेवली तर पिलांची धनगरी, शिकारी आणि स्थानांकित अशी वर्गवारी

करता येते व दिसायला अल्सेशियन पण वागायला फॉक्स टेरियर असे श्वान ग्राहकाच्या गरजेप्रमाणे पुरविणे सहज नसले तरी शक्य आहे. थोडी मेहनत घेऊन योग्य नर माद्या निवडून दिसायला अल्सेशियन आणि वागायला फॉक्स टेरियर अशी जात कोणीही पैदास कार पाच सहा वर्षांच्या प्रयत्नाने निर्माण करू शकतो.

विदर्भात व खानदेशात वंजारी, धनगरी आणि पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात पिसुरी - पश्मी शिकारी जातींच्या श्वानांचा दबदबा आहे. यांच्यात निवड करून बंगला किंवा शेतातले खळे सोडून जाणार नाहीत असे श्वान तयार करणे हे लक्ष्य पैदासकारांनी डोळ्यासमोर ठेवले तर तो एक उत्तम व्यवसाय केवळ तुमच्यासाठीच नाही, तर तुमच्या पुढच्या एक दोन पिढ्यांसाठीही निश्चित होऊ शकेल.